डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संचलित

हिन्दुस्तानी एज्युकेशम सोसायटी, औसा व्दारा संचलित

# शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण

ता. कळंब जि. उस्मानाबाद

राष्ट्रीय सेवा योजना

2021 - 2022

# वार्षिक कार्यक्रम अहवाल

प्राचार्य

डॉ. बिराजदार जी. डी.

कार्यक्रमाधिकारी

प्रा. डॉ. सय्यद अमर

सहकार्यक्रमाधिकारी

प्रा. भिसे आर. आर.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित

हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा व्दारा संचलित

# शरदचंद्र महाविद्यालय,शिराढोण

ता.कळंब जि.उस्मानाबाद

College Code 184

## राष्ट्रीय सेवा योजना

### वार्षिक कार्यक्रम अहवाल – २०२१-२२

मी राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचा प्रमुख म्हणुन आपल्या समोर वार्षिक नियमित कार्यक्रम अहवाल सादर करीत आहे.प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या नेतृत्याखाली व **डॉ.साजेद चाऊस** यांच्या मार्गदर्शना खाली व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने विद्यापीठाने घेण्यास सांगितलेले नियमित कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात व महाविद्यालय परिसरात घेण्यात आले त्याचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. **०६ जुन २०२१** रोजी **श्री. छत्रपती शिवराज्याभिषेक सोहळा** कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष इतिहास विभाग प्रमुख डॉ. घोलप के.जी. हे होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. सय्यद अमर यांनी सुत्रसंचलन व आभार मानले प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित श्री. सय्यद एम. व्ही. यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर विचार मांडले. कोविड- १९ चे पालन करून कार्यक्रम घेण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने **दि.२१जून २०२१** या दिवशी ऑनलाइन पध्दतिने **आंतरराष्ट्रीय योग दिवस** साजरा करण्यात आला.आंतरराष्ट्रीय योगदिवस हा दरवर्षी २१जून रोजी जगभरात साजरा केला जातो.संयूक्त राष्ट्रांनी याला मान्यता दिली आहे.भारतीय संस्कृती मध्ये योग साधनेला अनन्य साधारण महत्व आहे.योगसुत्रा व्दारे मानवाच्या शारिरीक,मानसीक व बौध्दिक विकासाची उन्नती साधता येते.योगाचे महत्व ओळखून २१जून २०२१ रोजी ऑनलाइन योगशिबीराचे आयोजन करण्यात आले.सकाळी ठिक ०७:०० वाजता सर्व प्राध्यापक व विद्यार्थी ऑनलाइन शिबीरास उपस्थित होते.याऑनलाइन शिबीरामध्ये प्रत्यक्ष कृतीव्दारे विविध योग साधनाचे महत्व पटवून देण्यात आले.योगाचे महत्व या विषयावर **श्री शशिकांत भातलंवडे** सर यांनी मार्गदर्शन केले कळंब येथील योगगुरु **श्री.संजय लक्ष्मीकांत खर्डेकर यांनी** योगाचे

ऑनलाइन सादरीकरण करुण सर्वांना योगाचे महत्त्व सांगितले.या वेळी प्राध्यापक व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.शेवटी सर्वांचे सहकार्यक्रम अधिकारी **प्रा. भिसे आर.आर.** यांनी आभार मांनले.

Sharadchandra Mahavidyalaya College Code 184 Shiradhon Ta Kallam

**छत्रपती शाहु महाराज** यांची जयंती दि. **२६ जून २०२१** रोजी शरदचंद्र महाविद्यालयात साजरी करण्यात आली. शाहु महाराज सुधारणावादी समाजसुधारक होते शाहु महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला.स्त्री शिक्षणाचा प्रचार व्हावा म्हणुन त्यांनी राजाज्ञा काढली व कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.अस्पृश्यता निवारणामध्ये मोलाचे कार्य केले अशा महापुरुषांची जयंती राष्ट्रीय सेवायोजना विभागाच्या वतिने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य. जी. डी.बिराजदार** हे होते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **डॉ.साजेद चाऊस** सर व **डॉ.अलटे शशिकांत** हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **डॉ.सय्यद अमर** यांनी केले. आभार प्रदर्शन **प्रा. भिसे आर. आर.** यांनी मांनले.

**दि. १ ते ७ जुलै २०२१** या कालावधीत **वन सप्ताह** साजरा करण्यात आला.या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** उपस्थित होते प्रमुख उपस्थिती **डॉ.साजेद चाऊस** सर, हरित सेना प्रमुख **डॉ.शिरमाळे एम.बी.** व **रा.से.यो.प्रमुख,प्रा. डॉ.सय्यद अमर व** सहकार्यक्रमाधिकारी **प्रा. भिसे आर.** यांच्या उपस्थितीत महाविद्यालय परिसरात शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवडीस हातभार लावण्यासाठी वृक्ष लागवड करण्यात आली.आपल्या जीवनात वृक्षांचे महत्त्व संवर्धन जतन या विषयी प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार प्रकट केले या वेळी प्राध्यापक व संयसेवक मोठ्या संखेने वृक्षलागवड करण्यासाठी उपस्थित होते. कोविड- १९ चे पालन करून कार्यक्रम घेण्यात आला.शेवटी **प्रा. भिसे आर.** यांनी आभार व्यक्त केले.

महाविद्यालयात **दि. १ ऑगस्ट २०२१** रोजी **लोकशाहिर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक स्मृती दिन** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर हे होते.तर प्रमुख पाहुणे **प्रा.डॉ.साजेद चाऊस** सर हे उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांनी लोकशाहिर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करुण लोकमान्य टिळक आणि आण्याभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदान चर्चा केली. उपस्थित प्राध्यापक व संयसेवक यांचे **प्रा.भिसे आर. आर.** यांनी आभार मानले.

**१५ ऑगस्ट २०२१** रोजी महाविद्यालयात **स्वातंत्र्य दिन** साजरा करण्यात आला. **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या हस्ते ध्वजारोहन करुण्यात आले. ध्वजारोहन करुण कोविड-१९ च्या काळात कार्य केलेल्या शासकीय रुग्णालय, शिराढोण येथिल कर्मचारी यांचा कोरोना योध्दा म्हणुन सत्काराचा कार्यक्रम प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.या वेळी महाविद्यालयाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केन्द्र शिराढोण

...ndra Mahavidyalaya College Code 184 Shiradhon Tq.Kallam

येथिल सर्व कर्मचारी यांना शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.प्रसंगी उपप्राचार्य डॉ. साजेद चाऊस यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंलन डॉ. तांबोळी एफ. ए. यांनी केले. आभार प्रा.डॉ. स्,यद अमर यांनी मानले.

**दि. २३ ऑगस्ट २०२१** रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद विद्यापीठाचा **वर्धापन दिन** महाविद्यालयात साजरा करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे मराठवाडा विभागातील एक प्रमुख विद्यापीठ आहे.सदरील विद्यापीठाची स्थापना २३ ऑगस्ट १९५८ रोजी झाली. सकाळी ०८:०५ वाजता विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून कोरोना योध्दा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमा मध्ये ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण येथिल कर्मचारी वर्गाचा सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण येथे कार्यरत सफाइ कर्मचारी यांना शाल, श्रीफळ देउन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** होते. प्रमुख पाहुणे श्री. शेख एम.एम. व डॉ. चाऊस एस.ए. होते. श्री. शेख एम.एम. यांनी कोविड -१९ काळातील भयावह परिस्थिती वर चर्चा केली व कोरोना काळातील आरोग्य कर्मचारी यांचे योगदान वर आपले विचार मांडले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**५ सप्टेंबर २०२१** रोजी **शिक्षक दिन** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** प्रमुख पाहुणे म्हणुन **डॉ.अकबरलाला सय्यद, डॉ.साजेद चाऊस** सर हे होते. प्रमुख पाहुण्यांनी शिक्षकांना विशेष सम्मान देण्यासाठी शिक्षकदिन साजरा केला जातो असे प्रतिपादन केले. भारताचे मा.राष्ट्रपती **डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन** यांचा जन्म दिवस ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिनाच्या स्वरुपात साजरा करण्यात येतो.या दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले.काही विद्यार्थ्यांनी शिक्षकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. **डॉ.सय्यद अमर** यांनी सुत्रसंचलन केले **प्रा.भिसे आर.आर.** यांनी आभारप्रदर्शन केले.

**१७ सप्टेंबर २०२१** रोजी महाविद्यालयात **मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन** साजरा करण्यात आला.सकाळी ०८:०५ वाजता महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.या प्रसंगी मराठवाडा मुक्तीसंग्रामा मध्ये योगदान देणाऱ्या थोर पुरुषांमध्ये **स्वामी रामानंद तिर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, देवीसिंग चव्हाण** इत्यादी मराठवाड्यातील स्वातंत्र्य सेनांनी विषयी महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर यांनी माहीती दिली. **डॉ.आल्टे एस.एम.** व **डॉ.शिरमाळे**

...andra Mahavidyalaya College Code 184 ...Shiradhon Tq.Kallam

**एम.बी.** हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थितांचे **प्रा. भिसे आर. आर.** यांनी आभार मानले.

**दि. ०२ ऑक्टोंबर २०२१** रोजी **राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती** कार्यक्रम साजरा करण्यात आला. अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर प्रमुख पाहुणे **डॉ.घोलप के.जी., डॉ.सय्यद ए.एफ,** हे मंचावर उपस्थित होते.या थोर महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरवात केली.प्रमुख पाहुण्यांनी मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते होते.अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी महात्मा गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळऊन दिले त्यांचा जन्म दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणुन साजरा केला जातो असे सांगीतले. **डॉ.बिराजदार जी.डी.** यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य,अहिंसा आणि सत्याग्रह यांचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.सुत्रसंचालन **डॉ.खोंड एस.व्ही.** यांनी तर आभार प्रदर्शन **प्रा. भिसे आर. आर.** यांनी केले.

**दि. १६ आक्टेंबर २०२१ रोजी श्रध्दाजंली सभा** चे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. मधुकर मुंडे सर यांचे निधन झाल्या मुळे शोक सभा व श्रध्दाजंली सभा आयोजीत करण्यात आली. प्रसंगी त्यांच्या आत्म्यास शांती लाभो यासाठी दोन मिनटाचे मौन बाळगण्यात आले. डॉ. साजेद चाऊस यांनी त्यांच्या आठवणी ना उजाळा दिला.

**दि. १६ आक्टेंबर २०२१** रोजी माझी वसुंधरा अभियान अंतर्गत **वृक्षारोपण कार्यक्रम** आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन महाविद्यालय परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. सदरिल कार्यक्रमास महाविद्यालयातिल सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

**दि. ३० आक्टेंबर २०२१** रोजी **कोवीड - १९ लसिकरण शिबीर** आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना शिबीरा च्या माध्यमाने कोविड - १९ ची लस देण्याचा उपक्रम राबवीला गेला. या शिबीरा साठी प्राथमीक आरोग्य केन्द्र शिराढोण यांची मदत घेण्यात आली. या शिबीरा व्दारे महाविद्यालयाती प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच गावातील लोकांनी कोविड १९ ची लस घेतली.

**३१ आक्टेंबर २०२१** रोजी **सरदार वल्लभभाई पटेल** यांची जयंती **राष्ट्रीय एकात्मता दिन** म्हणुन साजरी करण्यात आली. वल्लभ भाई पटेल हे राजकीय व सामाजिक नेते होते.देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात व मराठवाडा मुक्ती संग्रामात त्यांनी मोठे योगदान दिले आहे.त्यांना भारतीय महिलांनी सरदार या पदवीने संबोधीत केले प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** यांनी पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला या वेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थित सर्वांचे **प्रा. भिसे आर.आर.** यांनी आभार व्यक्त केले.

College Code 184

दि. ११ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात **मौलाना अबुल कलाम आझाद जयंती** उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. पटेल एस. एम. ह्या होत्या. त्यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या कार्यावर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. भिसे सर यांनी केले. आभार प्रा. गंभिरे पी.यू. यांनी मानले.

**२६ नोव्हेंबर २०२१** रोजी **संविधान दिन** साजरा करण्यात आला. संविधान दिनाचे औचित्य म्हणून डॉ.घोलप के.जी. यांनी संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन सर्व स्टाप व विद्यार्थी यांच्या समोर केले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वा खाली भारताच्या राज्यघटनेच्या निर्मीतीसाठी मसुदा समिती स्थापन झाली अनेक बैठका व चर्चे नंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समितीने स्वीकारला या दिनाचे महत्व ओळखुन २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणुन साजरा केला जातो.हे त्यांनी विद्याथ्यांना सविस्तर सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालतिल सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

२८ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात **महात्मा फुले** यांची **पुण्यतिथी** साजरी करण्यात आली.त्यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी **प्रा.अडसुळे एस.पी, डॉ.खोंड एस.व्ही, डॉ.सय्यद ए.एफ, डॉ.घोलप के.जी,** सर्व स्टाप व विद्यार्थी उपस्थित होते.

**१ डिसेंबर २०२१** रोजी महाविद्यालयात **जागतिक एड्स दिन** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन **डॉ.तांबोळी एफ ए** तर प्रमुख पाहुणे म्हणुन **प्रा.डॉ. खोंड एस.व्ही** हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात एड्स हा संसर्गजन्य आजार नाही.त्या साठी आपण एड्सग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे गेले पाहीजे आणि एड्स या रोगाच्या नायनाटासाठी जनजागृती करण्याची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले. उपस्थितांचे **डॉ.सय्यद अमर** यांनी आभार व्यक्त केले.

**६ डिसेंबर २०२१** रोजी महाविद्यालयात **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वान दिन** साजरा करण्यात आला.या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार सर,** उपप्राचार्य डॉ. साजेद चाऊस, सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पुष्पहार अर्पण करुण श्रंध्दांजली वाहण्यात आली. डॉ. आल्टे एस. एम. यांनी डॉ. आंबेडकर यांचे कार्यावर सविस्तर चर्चा केली.

**दि.१८ डिसेंबर २०२१** रोजी महाविद्यालयात **अल्पसंख्याक दिन** साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार हे** होते. प्रमुख मार्गदर्शक डॉ. तांबोळी एफ.ए. हे होते. त्यांनी अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नावर भाष्य केले, प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** यांनी अल्पसंख्याक संकल्पना समजावुन सांगितली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. भिसे आर. आर. व आभार प्रा.डॉ. सय्यद अमर यांनी मानले.

२० डिसेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात **संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी** साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** सर, **डॉ.शेख ए.आय.** सर्व स्टाप व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.डॉ.खोंड एस.व्ही.यांनी स्वच्छतेचे महत्व विषद केले.

College Code 184 ... Mahavidyalaya ... Ta.Kallam

३ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **सावित्रीबाई फुले जयंती** साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार, डॉ.घोलप के.जी, डॉ.सय्यद ए.एफ, रा.से.यो.प्रमुख प्रा. डॉ. सय्यद अमर** व सर्व स्टाप व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. प्रसंगी प्रा. डॉ. पटेल एस. एम. यांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्यावर प्रकाश टाकला. सुत्रसंचलन प्रा. अडसुळे एस.पी. आभार डॉ. अत्तार ए. एच. यांनी मानले.

दि. १२ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती** उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शेख ए.आय. हे होते. त्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्यावर चर्चा केली. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. दळवे एस.एम. व आभार प्रा. काझी झेड ए. यांनी मानले.

दि.१४ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **विद्यापीठ नामविस्तार दिन** मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिरमाळे एम.वी. हे होते. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरवात झाली. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिरमाळे एम.बी. यांनी विद्यापीठ नामविस्तार चा इतिहास सांगीतला. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. पटेल एस.एम. व आभार प्रा. शेख ए.आय. यांनी मानले.

दि. २५ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **राष्ट्रीय मतदार दिन** सपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. तांबोळी एफ.ए. हे होते. प्रमुख पाहुणे यांनी मतदार भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. सर्वांना मतदान करण्याची शपथ दिली. लोकशाहीत मतदानाचे महत्व सविस्तर विषद केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. आल्टे एस.एम. व आभार प्रा. सय्यद अमर यांनी मानले

२६ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **प्रजासत्ताक दिन** साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ८:०५ वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** सर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या वेळी **डॉ.सय्यद आर.आर.** व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि.०८ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयात अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. अंकुश कदम व

Mahavidyalaya College Code 184 Shiradhon Ta.Kallam

डॉ. मल्लिकनाथ बिराजदार हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी प्राध्यापकांची हक्क आणि कर्तव्य या विषयावर सतिस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. खोंड एस.व्ही. व आभार प्रा. डॉ. दळवे एस.एम. यांनी मानले.

दि. १२ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **विद्यार्थी प्रोत्साहन उपक्रमा** अंतर्गत शिराढोण गावातिल शासकीय कोठयातुन एम.बी.बी.एस. ला निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे श्री. चंदेले सर आणि श्री. महाजन सर उपस्थित होते. एम.बी.बी.एस. ला निवड झालेल्या संजयकुमार प्रजापती ची आर्थिक परिस्थिती बिकट असल्या मुळे महाविद्यालयाच्या वतिने त्यास आडोतिस हजार रु. मदत करण्यात आली. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. खोंड एस.व्ही. व आभार प्रा. डॉ. दळवे एस.एम. यांनी मानले.

दि. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयात छत्रपति शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. घोलप के.जी हे उपस्थित होते. प्रथम प्रतिमा पुजन करुन कार्यक्रम आरंभ करण्यात आला. प्रमुख पाहुणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर सतिस्तर चर्चा केली व त्यांच्या विचार प्रासंगिक आहेत असे सांगितले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. सय्यद अमर व आभार प्रा. डॉ. आल्टे एस.एम. यांनी मानले.

दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयात **संत गाडगे बाबा जयंती** साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. चाऊस साजेद हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक यांनी संत गाडगे बाबा यांचा स्वच्छता संदेश समजावला व त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. सदरील कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ०८ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात **अंतरराष्ट्रीय महिला दिन** साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. तांबोळी एफ.ए. हे उपस्थित होते. अंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयातील महिला कर्मचारी यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. सय्यद अमर व आभार प्रा. डॉ. आल्टे एस.एम. यांनी मानले.

दि. २३ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात **शहिद दिन साजरा** करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. रमाकांत कल्याणकर हे उपस्थित होते. त्यांनी शहिद दिनाच्या पार्श्वभुमिवर विस्तृत विचार मंथन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

...ge Code
184
...vidyalaya
...chon Tu Kallam...

दि. ०६ एप्रिल२०२२ रोजी महाविद्यालयात **विद्यार्थी प्रोत्साहन उपक्रमा** अंतर्गत महाविद्यालयातिल विद्यार्थी प्रथमेश बोंदर याचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. प्रथमेश बोंदर याची सेंट्रल बँक ऑफ मुंबइ च्या कब्बड्डी संघात निवड झाल्या बद्दल त्याचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. आप्पासाहेब बोंदर हे होते. कार्यक्रमास सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ११ एप्रिल२०२२ रोजी महाविद्यालयात **महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती** साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रम चालु झाला. महात्मा ज्योतिबा फुले यांचे व्यक्तित्व आणि कार्य यावर प्रा.डॉ. शिरमाळे एम. बी. मार्गदर्शन केले. महाविद्यालयातिल सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दि. ११ एप्रिल२०२२ रोजी महाविद्यालयात **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती** निमित **भारतीय संविधान या विषयावर अतिथि व्याख्यान** आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** हे होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. आल्टे एस. एम. व प्रा. काझी झेड ए. उपस्थित होते. प्रथम प्रा. काझी झेड ए.यांनी संविधान मधिल प्रस्तावनाचे वाचन केले. डॉ. आल्टे एस. एम.यांनी संविधान मधिल विविध भाग व कलमांचे स्पष्टिकरण केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. सय्यद अमर यांनी व आभार प्रा. डॉ. दळवे एस.एम. यांनी मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १४ एप्रिल२०२२ रोजी महाविद्यालयात **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती** उत्साहात संपन्न झाली. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास आरंभ करण्यात आला. प्रा.डॉ. सय्यद अमर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यांवर प्रकाश टाकला. अध्यक्षिय भाषण करत असताना प्राचार्य सरांनी आंबेडकरांचे सामाजिक, राजकिय, आर्थिक विचारावर चर्चा केली. सदरील कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होतो

वरील सर्व वार्षीक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. जी. डी. बिराजदार, उपप्राचार्य डॉ.साजेद चाऊस** यांचे सतत योगदान व कार्यक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन राहिले.तसेच सहकार्यक्रमाधिकारी **प्रा. भिसे आर.आर.** व महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक मित्र व कर्मचारी यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले त्या बद्दल त्यांचे मी कार्यक्रमाधिकारी या नात्याने सर्वांचे धन्यवाद मांनतो त्याच बरोबर माझे सर्व स्वयंसेवक प्रत्येंक कार्यक्रमात मोठया उत्सहाने सहभाग नोंदविला आणि कार्यक्रम यशस्वी पार पाडला त्या बद्दल त्यांचे देखील धन्यवाद मानतो मला पुर्ण खात्री आहे.या कार्यक्रमाच्या माध्यमातून माझा स्वंयसेवक हा सामाजिक कार्यकर्ता, देशाचा एक चांगला नागरिक म्हणुन नक्की पुढे येईल अशी आशा मी बाळगतो.

Sharadchandra Mahavidyalay
College Code
184
Shiradhon Tq.Kallam

धन्यवाद...!

कार्यमाधिकारी

प्रा.डॉ. सय्यद अमर

**N.S.S. Prog. Officer**
**Sharadchandra Mahavidyalay,Shiradhon**
**Tq.Kallamb,Dist.Osmanabad**

प्राचार्य

डॉ.जी.डी.बिराजदार

PRINCIPAL
Sharadchandra College
Shiradhon Ta.kallam





(श्री. छत्रपतिशिवाजीमहाराजशिवराज्यभिषेकसोहळा : 06 जुन 2021)





(आंतरराष्ट्रीय योगदिन :21जुन 2021)



*( माझी वसुधंराअभियानवृक्षारोपन : 05 जुलै 2021 )*





*( स्वातंत्रदिन : 15 ऑगष्ट 2021 )*





*( कोरोना योध्दासत्कार : 15 ऑगष्ट 2021 )*





*( कोरोना योध्दासत्कार : 15 ऑगष्ट 2021 )*





( शिक्षकदिन : 05 सप्टेंबर 2021 )





( मराठवाडामुक्तिसंग्रामदिन : 17 सप्टेबंर 2021 )




*( कोरोना योध्दासत्कार : 23ऑगष्ट 2021 )*




*( कोरोना योध्दासत्कार : 23 ऑगष्ट 2021 )*




*( महात्मागांधी व लालबहादूर शास्त्री जयंती : 02ऑक्टोंबर 2021 )*




*( माजीप्राचार्यडॉ. मधुकरमुंडे श्रध्दाजंलीसभा : 16ऑक्टोंबर 2021 )*




*( कोविड : 19 लसीकरणशिबीर : 30 ऑक्टोंबर 2021 )*





*( कोविड : 19 लसीकरणशिबीर : 30 ऑक्टोंबर 2021 )*





*( भारतीय संविधानदिन : 26नोव्हेंबर 2021 )*



*( भारतीय संविधानदिनप्रस्तावनावाचन : 26 नोव्हेंबर 2021 )*





( डॉ. बाबासाहेबआंबेडकरमहापरिनिर्वाणदिन : 06 डिसेंबर 2021 )




( अल्पसंख्याकअधिकारदिवस : 18डिसेंबर 2021 )




( सावित्रिबाइफुलेजयंती : 03 जानेवारी 2022)




( राजमाताजिजाउ व स्वामीविवेकानंदजयंती : 12जानेवारी 2022)





( विद्यार्थीप्रोत्साहनकार्यक्रम :सत्कारसमारंभ व आर्थिकमदत : 12 फेब्रुवारी2022 )




( विद्यार्थीप्रोत्साहनकार्यक्रम: सत्कारसमारंभ व आर्थिकमदत : 12 फेब्रुवारी 2022 )




*( आंतरराष्ट्रीय महिलादिन : 08 मार्च 2022 )*





*( शहीददिन : 23मार्च 2022 )*




( विद्यार्थीप्रोत्साहनकार्यक्रम : सत्कारसमारंभ : 06 एप्रिल 2022 )




( विद्यार्थीप्रोत्साहनकार्यक्रम : सत्कारसमारंभ : 06 एप्रिल 2022 )




*( भारतीय संतिधान–अतिथीव्याख्यान : 11 एप्रिल 2022 )*




*( महात्माज्योतिबाफुलेजयंती : 11 एप्रिल 2022 )*




*( संस्थापकआदरनिय एन. बी. शेख साहेबस्मृतिदिन : 04 डिसेंबर2021)*




*( कर्मचारीप्रोत्साहनकार्यक्रम : सत्कारसमारंभ )*